You Tube Live
f LIVE
सह्याद्री न्यूज चॅनलच्या थेट प्रक्षेपण (LIVE) कार्यक्रमास हजारो प्रेक्षकांनी प्रतिसाद दिला त्याबद्दल आभार !!
कार्यक्रमाच्या थेट प्रक्षेपण (LIVE) साठी संपर्क
9011708840, 9673560360

RNI. MAHMAR/2018/77866

मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे

वर्ष ५ | DIGITAL EDITION | रविवार, दि. २४ जुलै २०२२ | पृष्ठ ४ | मुल्य ५ /- रूपये

## वरोरा व भद्रावती तालुक्यातील नुकसानग्रस्त पिकांची

# जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

गत १५ दिवसांपासून पडत असलेल्या सततच्या पावसामुळे वर्धा नदीला मोठ्या प्रमाणात पूर आला. या पुरामुळे वरोरा तालुक्यात ९५४८ हेक्टर तर भद्रावती तालुक्यात ७८०० हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले तसेच घरांची पडझड झाली. या नुकसानीची पाहणी करण्याकरीता जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी पिपरी, कोंढा, पाताळा, पळसगाव, भद्रावती, करंजी, आणि वरोरा येथे प्रत्यक्ष भेट दिली.

यावेळी तालुका यंत्रणेचा आढावा घेतांना जिल्हाधिकारी म्हणाले, शेत पीक नुकसनीचे पंचनामे त्वरित हाती घ्यावे. तसेच पड़झड झालेल्या घरांचे पंचनामे पूर्ण करावे. रेशन धान्य वेळेत गावात पोहोचेल अशी व्यवस्था करावी. पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यांची यादी करून जिल्हा कार्यालयास सादर करावी. पशुसंवर्धन विभागाने चाऱ्याचा आढावा घ्यावा व मागणी नोंदवावी. शेतकऱ्यांची वीज तपासून चालू करावी. पूरग्रस्त भागात पिण्याचे स्वच्छ पाणी, परिसरात फॉगिंग मशीनने फवारणी करून आरोग्य तपासणी त्वरित करावी, अशा सूचना जिल्हाधिका-यांनी दिल्या. यावेळी त्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधत शेत, घर, गोठे याबाबत माहिती घेतली.

पाहणी दरम्यान आमदार प्रतिभा धानोरकर, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा गौरकार, उपविभागीय अधिकारी सुभाष शिंदे, सा. बा. विभागाचे कार्यकारी अभियंता कुंभे, भद्रावतीचे तहसीलदार सोनवणे, वरोराचे तहसीलदार रोशन मकवाने यांच्यासह दोन्ही तालुक्याचे गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी व इतर सर्व तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते.

## बल्लारपूर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

गत दोन आठवड्यापासून जिल्ह्यात सुरू असलेल्या पावसामुळे अनेक तालुक्यांना जबर फटका बसला. बल्लारपूर तालुक्यातसुध्दा मोठ्या प्रमाणावर शेतमालाची तसेच नागरिकांच्या मालमत्तेची हानी झाली. या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांनी बल्लारपूर तालुक्यातील दुधोली, बामणी, दलेली या गावांना भेटी दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी दीप्ती सुर्यवंशी - पाटील, तहसीलदार संजय राईंचवार, न.प. मुख्याधिकारी विजय देवळीकर, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणचे अभियंता श्री. वाढई, सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता वैभव जोशी, तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकाऱ्यांनी वर्धा नदीच्या पुलाची पाहणी केल्यानंतर नगर परिषद क्षेत्रातील गणपती वॉर्ड येथील पूरग्रस्त भागाची पाहणी केली. तसेच तालुक्याच्या सर्व प्रमुख अधिका-यांची उपविभागीय कार्यालयात बैठक घेऊन पुरामुळे झालेल्या शेतमालाच्या व घराच्या नुकसानीचा आढावा घेतला. नुकसानीचे तात्काळ पंचनामे करावे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणने रस्त्यावर पडलेले खड्डे त्वरीत बुजवावे, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

बल्लारपूर तालुक्यात लागवडीखाली एकूण ६०८८६ हेक्टर क्षेत्र असून पुरामुळे बाधित क्षेत्र १५६४ हेक्टर आहे. पुराचा फटका तालुक्यातील १३२७ शेतकऱ्यांना बसला आहे. आतापर्यंत नुकसानग्रस्त २०२ घरांचे तसेच काही शेतमालाचे पंचनामे करण्यात आले आहे. मात्र अजुनही काही क्षेत्रात पुराचे पाणी असल्यामुळे दोन-दिवसांत संपूर्ण पंचनामे करण्यात येतील, अशी माहिती तहसीलदार राईंचवार यांनी दिली.

यावेळी बामणीचे सरपंच सुभाष ताजणे, मंडळ अधिकारी शंकर खोब्रागडे, तलाठी शंकर खरूले, कृषीसेवक राहुल अहिरराव आदी उपस्थित होते.

## अखेर त्या मृतकाची ओळख पटली

### पत्नीला पळविल्याचा राग ; प्रियकराच्या वडीलाचा केला घातपात ?

**वरोरा / प्रतिनिधी**

कुचना गावालगत असलेल्या कोराडी नालाच्या पुलाखाली एका अज्ञात व्यक्तीचे प्रेत आढळून आले होते. हि माहिती कळताच माजरी पोलिसांना कळतच घटनास्थळी दाखल झाले होते. मृतक अज्ञात असल्याने पोलिसांनी शोध कार्य सुरु केले असता आज त्या अज्ञात मृतकाचे ओळख पटली असून मृतक माजरी येथील रामभाऊ ज्ञानेश्वर पाटील, वय ५० वर्ष, असून सदर इसमाचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली आहे. मृतकाच्या मुलाने आरोपीच्या पत्नीला पळवून नेले असल्याचा राग मनात ठेवून आरोपीने सदर मृतकाची हत्या केल्याचे उघडकीस आले आहे.

**पुराणे आणला तपासात व्यत्यय**

सदर आरोपीला पोलिसांनी न्यायालयात हजार केले असता न्यायालयाने त्याला पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली . पण कोंढा येथील नाल्याला तसेच शीर नदीला पूर आल्याने आरोपीला भद्रवती पोलीस ठाण्यात ठेवण्यात आले . त्यामुळे पोलिसांचा आजचा तपास थांबला असेच म्हणावे लागेल .



अंदाजे ५० वर्ष वयाचा पुरुष उबडया स्थितीत कोराडी नाल्याचे पुलाखाली मरुन पडलेला असल्याचे आढळुन आले होते . त्यानुसार घटनास्थळाची व प्रेताची पचासमक्ष पोलिसांनी पाहणी केली यावेळी मृतक अनोळखी पुरुष, वय ५० वर्ष, ज्याचे डोक्याचे उजवे बाजुला जबर मारहाण केल्याच्या जखमा आढळुन आल्या. त्यानुसार नमुद अनोळखी मृतकाचा खुन झाला असल्याबाबत दाट संशय पोलिसांना आला होता. त्यामुळे घटनास्थळाचा पंचनामा करुन पोस्टे माजरी येथील पोहवा हरिदास चोपने, यांनी शासनातर्फे दिलेले तक्रारीवरुन पो.स्टे. माजरी येथे कलम ३०२ भादवी प्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती .

सदर गुन्ह्याचे अनुषंगाने अरविंद साळवे (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक चंद्रपुर यांनी गुन्ह्याचे घटनास्थळी तसेच पोलीस स्टेशन माजरी येथे भेट देउन गुन्ह्याचे तपासाबाबत निर्देश दिले या वरून उपविभागीय पोलीस अधिकारी आयुष नोपानी, भा.पो.से. यांचे नेतृत्वात तपासाकरीता पोलीस स्टेशन माजरी, स्थानिक गुन्हे शाखा, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय वरोरा, सायबर सेल चंद्रपुर येथील पोलीस स्टॉफ ची वेगवेगळी तपास पथक गठीत करण्यात आली होती.

अनोळखी मृतकाची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरु असतानाच सिकंदर रामभाऊ पाटील, रा. माजरी कॉलरी याने पोलिसांनी प्रसिध्द केलेल्या शोध पत्रिकेनुसार मृतकाचे प्रेत पाहुन ओळखले व सदर गुन्ह्यातील मृतक त्याचे वडील रामभाऊ ज्ञानेश्वर पाटील, वय ५० वर्ष, रा. आंबेडकर वार्ड माजरी कॉलरी हेच असल्याचे स्पष्ट सांगीतले. त्यावरुन नमुद मृतकाची ओळख पटली असून त्यानंतर सदर गुन्ह्याचे पुढील तपासा दरम्यान मृतकाचा मुलगा सिंकदर रामभाऊ पाटील रा. गाजरी कॉलरी यास विचारपुस केली असता त्याने सांगीतले की, माजरी कॉलरी येथील पिंटु पेटकर याचे पत्नीसोबत प्रेमसंबंध असल्याचा संशयातून पिंटु पेटकर हा नेहमी आमचे सोबत वादविवाद करत होता, मला व माझ्या कुटुंबाला मारण्याची धमकी देत होता. अशी महती मृतकाच्या मुलाने सांगताच लागलीच आशिष उर्फ पिंटु प्रदीप पेटकर, वय ३२ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड माजरी कॉलरी यास ताब्यात घेतले. त्यास सदर गुन्ह्यासबंधाने बारकाईने विचारपुस केली असता त्याने मृतकाचा मोठा मुलगा सिकंदर रामभाऊ पाटील यांने माझ्या पत्नीसोबत प्रेमसंबंध प्रस्तापित करुन पळवून नेले व तो भद्रावती येथे माझ्या पत्नीसह राहत आहे. त्यामुळे त्याचा राग मनात धरुन मी सिंकदरच्या वडीलाला दोन साथीदारांचे सोबत मिळुन महाविर स्कुलमध्ये पूर पिडीत लोकांच्या कॅम्प मधुन चारचाकी गाडीमध्ये मध्ये जबरदस्तीने बसवुन कोराडी नाल्याचे पुलीया जवळ नेवून हत्याराने डोक्यावर मारले व पुलाच्या खाली टाकुन दिले.

मृतकाचा मोठा मुलगा सिकंदर रामभाऊ पाटील याने आरोपी आशिष उर्फ पिंटु प्रदीप पेटकर, वय ३२ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड माजरी कॉलरी याच्या बायकोला पळवुन नेले. मुलाचा बदला घेण्याकरीता त्यांनी कट रचुन वडीलास जिवानिशी ठार मारले व वडीलाचे मयतीला जेव्हा आरोपीचे पत्नीला पळवून नेणारा सिकंदर रामभाऊ पाटील हा घरी येईल, त्यावेळी त्याला सुध्दा ठार मारणार असल्याचे आरोपीने पोलिसांना सांगितले.

पोलीस अधिक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात तपास अधिकारी आयुष नोपानी, सहाय्यक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सा. वरोरा, बाळासाहेब खाडे, स्थानिक पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा चंद्रपुर, पोनि पाटील, वाहतुक शाखा चंद्रपुर, सपोनि विनीत घागे, ठाणेदार पो.स्टे माजरी, सपोनी अजितसिंग देवरे, पोस्टे माजरी, सपोनी बोबडे, स्था. गु.शा. चंद्रपुर, सपोनि भोयर, सपोनी कापडे व स्थानीक गुन्हे शाखा चंद्रपुर स्टाफ, सपोनी मडावी पो.स्टे वरोरा, पोउपनि कोल्हे पोस्टे भद्रावती, सायबर सेल चंद्रपुरचे पोलीस अंमलदार, पोली स्टेशन माजरी येथील पोहवा हरीदास चोपने, पोहवा गजानन जुगडे, पोहवा बंडु मोहुर्ले, पोहवा सुधाकर घाटे, नाप अतुल गुरनुले, नापोअं अनिल बैठा, पोअ गुरु शिंदे, पोअ आकाश चेन्नुरवार, पोअं हरीचंद्र, पोअ रविंद्र गिते, म अक्षिता, पोस्टे बल्लारशा पोअं शरद कुळे, पोअं. संतोष दंडेवार, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाचे आमने, मधुकर आत्राम यांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणला असुन आयुष नोपानी (भा.पो.से.) उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरां हे पुढील तपास करीत आहे.

## अखेर त्या महिलेचा मृतदेह सापडला

**ब्रम्हपुरी / प्रतिनिधी**

आरमोरी-ब्रम्हपुरी मुख्य मार्गावरील वैनगंगा नदीच्या पुलावरून महिलेने उडी घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना १८ जुलै २०२२ ला दुपारी १ ते २ वाजे दरम्यान घडली होती. उडी मारलेल्या सदर महिलेचे नाव — लता भाऊराव डोईजड रा. नागभीड येथील रहिवासी होत्या. वैनगंगा नदी पत्रात उडी घेतली असल्याने त्या महिलेचा मृतदेह शोधण्यासाठी बचाव पथकाला प्रचारण करण्यात आले होते. त्यानुसार स्थानिक प्रशासन व पोलीस विभागाच्या वतीने मृतदेह शोधण्यासाठी



वैनगंगा नदी पात्रात शोध मोहीम राबवण्यात येत आहे. बचाव पथकाला महिलेचा मृतदेह सापडले आहे. सदर महिलेचा मृतदेह आरमोरी जवळील डोंगरगाव येथे आढळला. घटनेचा पुढीपल तपास संबधित पोलिस विभाग करीत आहे.

## चंद्रपूर जि.प. माजी गट नेता डॉ. सतीश वारजुकर यांनी पूर परिस्थिती केली पाहणी

**चिमूर / प्रतिनिधी**

विधानसभेचे समन्वयक तथा चंद्रपूर जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्ष गट नेता डॉ. सतिश वारजुकर यांनी दि. २२ जुलै रोजी येरखेडा गट ग्राम पंचायत अंतर्गत कळमगाव येथील पुर परस्थितीची पाहणी केली. सतत येत असलेल्या मुसळधार पाऊसामुळे जिकडे तिकडे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. पुराचे पाणी गावात येत असून अनेक कुटुंबे रस्त्यावर आले आहेत. कळमगाव येथे काहीशी अशीच परिस्थिती निर्माण झाली होती. येथील शंकर बावणे, कमल श्रीरामे , दवलत श्रीरामे, राष्ट्रपाल गजभे, कुसुम डांगे यांच्या घराची खूप मोठ्या प्रमाणात नुकसान



झाली आहे. याची माहिती मिळताच कळमगाव येथे जाऊन गरजूंना आर्थिक मदत केली यावेळी पंचायत समिती चिमूर चे माजी उपसभापती तथा अध्यक्ष चिमूर विधानसभा युवक कॉँग्रेस रोषण ढोक, चिमूर शहर अध्यक्ष अविनाश अगडे, विधानसभा उपाध्यक्ष नागेंद्र चट्टे, तालुका अध्यक्ष पर्यावरण विभाग प्रदिपजी तळवेकर, जिल्हा महासचिव युवक कॉँग्रेस गौतम पाटील, मीडिया प्रमुख पप्पु शेख, व गावकरी उपस्थित होते.

## चंद्रपूर जिल्हा परिषदेसाठी २८ जुलैला आरक्षण सोडत

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाने आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका पार पाडण्यासाठी हालचाल सुरु केली. आता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण महिलांसाठी आरक्षण सोडत २८ जुलैला काढली जाणार आहे. यामध्ये जिल्हा परिषदेचे ६२ गट व १५ पंचायत समितीचे १२४ गणासाठी आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

यापूर्वी १३ जुलै रोजी जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणांची आरक्षण सोडत काढली जाणार होती. मात्र नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी ) आरक्षणाचा समावेश नव्हता. परिणामी राज्य निवडणूक आयोगाने त्यावेळी आरक्षण सोडतीला स्थगिती दिली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर व दोन आठवड्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर करण्याचे निर्देश दिल्याने निवडणूक आयोग सक्रिय झाले आहे.

त्यानुसार जिल्हा परिषद ६२ गटासाठी जिल्हाधिकारी कार्यालय तर १५ पंचायत समितीच्या १२४ गणासाठी तहसील कार्यालयात २८ जुलैला आरक्षित जागेसाठी आरक्षण सोडत काढली जाणार आहे. या आरक्षण सोडतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी )व सर्वसाधारण महिला जागा गट व गणासाठी राखीव केल्या जाणार आहे. राज्य निवडणूक आयोगाने अलीकडेच जिल्हा परिषदेच्या ६२ गटाला व १५ पंचायत समितीच्या १२४ गणाला मान्यता दिली असून गट व गणांची रचना केली आहे. ओबीसीच्या राजकीय आरक्षणावर शिक्कामोर्तब झाल्याने ग्रामीण भागातील इच्छुक उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## भाजपतर्फे पूरग्रस्त भागात मोफत जलसेवा सुरु

### भाजप युवा मोर्चा उपाध्यक्ष आकाश वानखडे यांचा पुढाकार

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून चंद्रपूर जिल्ह्यातील बऱ्याच गावांना पुराणे वेढा घातल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे . भद्रावती तालुक्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी राज्याचे माजी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी २० जुलै रोजी केली होती. पुराच्या पाण्यामुळे अनेक गावातील पाणीपुरवढा पाईप लाईनचे नुकसान झाल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याच्या अनेक तक्रारी या वेळेस नागरिकांकडून करण्यात आल्या होत्या . यावेळेस या गावातील नागरिकांना मोफत पिण्याचे पाणी पुरविण्याचे आदेश




मुनगंटीवार यांनी भाजप पदाधिकाऱ्यांना दिले होते . त्यानुसार भाजप जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शनात भद्रावती येथील भाजयुमोचे जिल्हा उपाध्यक्ष आकाश वानखडे यांनी आजपासून या पूरग्रस्त भागात मोफत जल सेवा सुरु केली आहे.

वरोरा भद्रावती तालुक्यातील वर्धा नदी किनाऱ्यावर वसलेल्या अनेक गावांना पुराचा फटका बसला आहे . यावेळी पूर एवढा भयावह आहे की, यात शेती ,घर , जीवनावश्यक वस्तू या पुराच्या पाण्यात बुडाल्याने खराब झाल्या आहेत . तसेच पाण्याच्या प्रवाहामुळे अनेक गावांना पाणी पुरवठा करणारी पाईपलाईन व मोटारपंप पाण्यात बुडाल्याने शुद्ध पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता .

याबाबत काल नागरिकांनी आपल्या समस्या आमदार सुधीर मुनगंटीवार , माजी केंद्रीय गृहमंत्री हंसराज अहिर यांना बोलून दाखविल्या . या समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन या गावांना मोफत शुद्ध पाणी पोहचविण्याचा सूचना तसेच आदेश स्थानिक पदाधिकाऱ्यांना या वेळी मुनगंटीवार व अहीर यांनी दिल्या होत्या .

त्यानुसार २१ जुलै पासून भाजप जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्या मार्गदर्शन भाजयुमोचे जिल्हाउपाध्यक्ष आकाश वानखडे यांच्या नेतृत्वात तालुक्यातील त्या पूरग्रस्त भागात टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवढा सुरु करण्यात आला आहे . जोपर्यंत या गावांची नादुरुस्त पाणी पुरवठा पाईपलाईन , मोटार पंप सुरळीत सुरु होत नाही तो पर्यंत ही जलसेवा सतत सुरु राहील असे वानखडे यांनी आमच्या प्रतिनिधीला सांगितले . ज्या गावांना शुद्ध पाण्याची कमतरता आहे. त्यांनी भाजपच्या स्थानिक कार्यकर्त्यांशी संपर्क साधावा म्हणजे आम्हाला त्या ठिकाणी पाणी पुरवढा करता येईल असे आवाहनही यावेळी त्यांनी केले . त्यांना या कामात विजय वानखडे, विस्मय बहादे, प्रदीप मांडवकर , निलेश नवघरे या उपक्रमासाठी अथक परिश्रम मदत करीत आहे.



# कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात केलेला आयकर गहाळ ?

## पंचायत समिती वरोरा येथील भ्रष्टाचाराविरोधात अखिल वरोरा शिक्षक संघ पोलिसात तक्रार दाखल करणार?

**वरोरा / प्रतिनिधी**

पंचायत समिती वरोरा कार्यालयाने लेखा वर्ष २०२२-२३ चा आयकर त्यांच्या पॅनवर जमा न करता परस्पर गहाळ केल्याचे कर्मचाऱ्यांनी काढलेल्या '२६ - ए. एस. ' वरुन दिसत आहे. मागील वर्षीही कार्यालयाकडून असाच प्रकार घडला होता . याबाबत विचारणा केली असता समर्पक उत्तर मिळाले नाही. मागील वर्षीच्या पगारातून दरमहा कपात केलेला आयकर संबंधितांच्या पॅन नंबरवर जमा केलेला नाही . संबंधितांना रिटर्न फाईल करतेवेळी पगारातून नियमित कपात केली असतांनाही आगावू रक्कम ऑनलाईन भरावी लागत होती . या भ्रष्टाचाराविरोधात अखिल वरोरा शिक्षक संघ आक्रमक झाला असून पोलिसात तक्रार देण्याची परवानगी संवर्ग विकास अधिकारी यांना मागितली आहे .



यावर्षीही कार्यालयाने नियमित दरमहा आयकर कपात करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा आयकर त्यांच्या पॅनवर अजूनही जमा केलेला नाही . त्यामुळे नक्कीच पं. स. वरोराने कर्मचा-यांच्या पगारातून कपात केलेला सन २०२२-२३ या लेखा वर्षातील आयकर गहाळ किंवा अपहार केलेला आहे .

ही अतिशय गंभीर बाब असून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला असल्याचे निदर्शनास येत असल्यामुळे अखिल वरोरा शिक्षक संघाने संवर्ग विकास अधिकारी वरोरा यांना याविरोधात संघटनेच्या वतिने पोलिसात तक्रार नोंदविण्याची परवानगी मागण्यासाठी निवेदन दिलेले आहे.

आपल्या वरोरा पं. स. तील कर्मचा-यांची संख्या व त्यांच्या पगारातून दरमहा आयकरासाठी कपात केली जाणारी रक्कम ही प्रत्येकी वर्ष अखेरपर्यंत २० ते ३० हजार रुपया पर्यंत असते . संबधित कर्मचा-यांच्या पगारातून कपात झालेली ही रक्कम आयकर विभागाला का पोहचली नाही ? किंवा कुठे गहाळ झाली ? हा आता तपासाचा विषय बनला आहे . या संदर्भात वेळप्रसंगी अखिल वरोरा शिक्षक संघ आंदोलनाचा पवित्रा उचलण्याच्या तयारीत आहे .

# केंद्रीय मानवाधिकार संगठनने दिला पुरग्रस्तांना मदतीचा हात

**वरोरा / प्रतिनिधी**

जिल्हयात मागील १५ दिवसांपासून संततधार पावसामुळे वरोरा तालुक्यातील करंजी येथे पुर आल्याने मागील ३ दिवसापासून गावांतील नागरिक साई मंगल कार्यालय येथे आसरा घेतला होता. जवळपास २५० नागरिकांची जेवनाची सोय संगठनने मार्फत करण्यात आली.



गावातील पुराची पातळी कमी झाल्यानंतर सर्व नागरिकांना सुरक्षितरित्या त्याच्या करंजी गावाला बसचा खर्च देवून पाठविण्यात आले. विदर्भ प्रदेश डॉ. अंकुश आगलावे यांच्या व्दारे १२५ नागरिकांना धान्याचे किट्स देण्यात आले. शासनाची मदत पोहचण्याआधी केंद्रीय मानवाधिकार संगठनेमार्फत नागरिकांना मदत पोहचविणात आली. .

वरोरा तालुक्यातील अनेक पुरग्रस्त भागात केंद्रीय मानवाधिकार संगठननेच्या माध्यमातून. पुरग्रस्तांना पाण्याची कॅन, धान्याचे, किट्स, औषधोउपचाराचा खर्च, इत्यादी स्वखर्चाने देण्यात आला. मानव सेवा हिच ईश्वर सेवा असून त्यातच समाजाचे भले असल्याचे मत डॉ. अंकुश आगलावे विदर्भ प्रदेश अध्यक्ष, केंद्रीय मानवाधिकार संगठन यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे सागितले आहे. यावेळी नारायण वरारकर, उत्तम इंगोले, हनुमान शेंडे, गाडगे महाराज, प्रणाली काळे सरपंच करंजी, पटवारी तसेच गुरूदेव सेवा मंडळाचे प्रचारक व केंद्रीय मानवाधिकार संगठनचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आमदार प्रतिभा धानोरकर जिल्हा प्रशासनासोबत ऑनफिल्ड




**चंद्रपूर / प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसापासून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडला. त्यात दोनवेळा पुराचा फटका जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागांना बसला. जिल्ह्यातील वरोरा - भद्रावती तालुक्यात मोठ्या प्रमाणात नागरिकांचे जनजीवन विस्करीत झाले आहे. येथील मोठ्या प्रमाणात घरांची पाण्यामुळे पडझड झाली. शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याची पाहणी करण्यासाठी आमदार प्रतिभाताई यांची जिल्हाधिकारी अजय गुल्हाने यांच्यासह जिल्हा प्रशासनासोबत ऑनफिल्ड पाहणी केली.

आज भद्रावती तालुक्यातील पिपरी, पाटाळा, माणगांव, पळसगांव, कोंडा तर वरोरा तालुक्यातील करंजी येथे भेटी दिल्या.

याप्रसंगी उपविभागीय अधिकारी शिंदे, वरोरा - भद्रावती येथील तहसीलदार, आरोग्य अधिकारी, कृषी अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे भद्रावती उपविभागीय अभियंता मत्ते, भद्रावती उपविभागीय अभियंता मेंढे यांच्यासह अन्य अधिकारी तसेच पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

वरोरा - भद्रावती येथे मोठ्या प्रमाणात शेती करण्यात येते. त्यासोबतच तालुक्यातील मोठा भाग हा ग्रामीण आहे. या भागातील सुमारे ३३९ घरांची पडझड झाली आहे. त्यांच्या निवासाचा प्रश्न हा निर्माण झाला आहे. त्यासोबतच शेतकरी शेतीसोबत पाळीव जनावरे देखील पाळत असतात. परंतु या पुरामुळे त्यांचा देखील मृत्यू झाला आहे. त्यामुळे वरील बिकट परिस्थितीचा विचार करता शासनाने आर्थिक पॅकेज जाहीर करून दिलासा देण्याची गरज आहे.तात्काळ पंचनामे करण्याच्या सूचना यावेळी आमदार प्रतिभाताई धानोरकर यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या.

# पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान

**मुल / प्रतिनिधी**

राज्यभरात मुल शहर एक सुंदर शहर, स्मार्ट सिटी म्हणून ओळख करण्यात आली असली तरी अवघ्या काही तासांच्या मुसळधार पावसाने अवघे मूल शहर जलमय झाल्याचे चित्र आज दि.२३ जुलैला निर्माण झाले.

आजच्या पावसाने स्मार्ट सिटी पाण्यात गेल्याचे दिसून येत होते. काल रात्रो पासून आलेल्या सतत मुसळधार पावसामुळे. कर्मवीर महाविद्यालय पासून वाहत आलेल्या पाऊसामुळे वॉर्ड नंबर १५ मधील चिंतावार लेआऊट संपूर्ण जलमय झालेला आहे. उपजिल्हा रुग्णालय कड्डील भागातील बुटेच्या घराकडे, शेलेकरच्या घराकडे, पानसे पासून पुढे तर संतोष सहारेचा रस्ता, सोनवणे घरापुढील रस्ते पाण्याने व्यापून गेल्याने अनेक घरात पाणी घुसल्याने बेडरूम, किचन, स्टोररुम मधील साहित्याची नासाडी झाली आहे. वानखेडे यांच्या घरापासून सोनवणे यांच्या घरापर्यंतचा मुख्य हायवे रस्ता काही काळ पाण्याने बंद झाला असे विदारक चित्र मुल सारख्या स्मार्ट सिटीत निर्माण झाले. याला जबाबदार कोण असा प्रश्न मूलच्या नागरिकांनी उपस्थित केला आहे . तसेच दुर्गा मंदिराच्या मागून गेलेल्या डी.पी. रोड पूर्ण जलमय झाला. रोडच्या दोन्ही बाजूच्या घरात पाणीच पानी घुसले. दुर्गा मंदिर आवारात सुद्धा पाणी घुसल्याने पुराचा पुराचे स्वरूप प्राप्त झाले आहे. हीच अवस्था वॉर्ड नंबर १४ मधे झाली असून पंचायत समिती क्वार्टर पासून नगर परिषद तत्कालीन पदाधिकारी व नगर प्रशासनाच्या नियोजन शून्य कारभारामुळे निर्माण झाली आहे. मोगरे लेआऊट मधील नागरिकांच्या घरात पाणी घुसल. पाणी जाण्यासाठी मार्ग नाही. त्यामुळे घराच्या खालून झरे वाहत आहेत. अंगणातून पाणी वाहत असल्याने अनेक नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागत आहे.

# वडीलाने घराबाहेर काढल्याचा राग.. म्हणून साधला अल्पवयीन मुलाने चोरीचा डाव

## चोरट्याने बिअर बार मध्ये उडवला चोरीचा माल

**चिमूर / प्रतिनिधी**

खोड्या केल्या म्हणून वडिलांनी खोडकर मुलाला घर बाहेर काढले . वडिलांनी घराबाहेर काढल्याचा राग मनात ठेवून . एका सतरा वर्षीय अल्पवयीन मुलाने शांती वॉर्ड येथील हबिबखा उस्ताद दर्ग्या मधील रकमेवर कुलूप तोडून डाव मारल्याची घटना नुकतीच उघडकीस आली.

चोरी झाल्याची माहिति दर्ग्यातील नागरिकांना होताच त्यांनी २ दिवसापूर्वी पोलीस स्टेशन ला फिर्याद नोंदवली आणि दि २२ जुलैला संशय येताच पोलिसांना माहिती देताच पोलीस घटनास्थळी दाखल होऊन चोरी करणाऱ्या संशयित सतरा वर्षीय मुलाला अटक करताच त्याने चोरी केल्याचे कुबल करीत २० हजार रुपयांची चोरी केल्याचे सांगितले.

सविस्तर वृत्त असे की नेरी येथील शांती वार्डात हबिबखा उस्ताद दर्गा असून या दर्ग्यावर नेहमीच भक्त भाविकांची पूजा अर्चा करण्यासाठी ये जा असते आणि दर्ग्यातील दान पेटीत भाविक दान करीत असतात.

नेहमी प्रमाणे सुरळीत सुरू असताना दोन दिवसांपूर्वी दर्ग्यातील दानपेटी फोडल्याचे निदर्शनात येताच दर्गा कमेटी ने पोलीस स्टेशनला चोरीची फिर्याद दिली.

त्यानंतर २ दिवसांनी त्याच परिसरात राहणार एक अल्पवयीन मुलगा हा कुठल्याही प्रकारचे काम करीत नसून यांच्याकडे मौज करण्यासाठी कुठून पैसे आले असा संशय दर्ग्या कमिटीच्या लोकांना येताच त्यांनी पोलिसांना माहिति दिली.

पोलिसांनी तात्काळ नेरी येथे येऊन अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आणि चोरी बदल विचारले असता त्याची हकीकत ऐकून सर्वच दंग झाले सदर अल्पवयीन मुलाला वडिलांनी घराबाहेर काढले म्हणून खाण्या पिण्यासाठी मौज करण्यासाठी पैसे नसल्याने चोरी केल्याचे कबूल केले सदर चोरीतील पैसाने १५ हजार रुपयांचा

# इनरव्हील क्लब वरोराचा पदग्रहण सोहळा



**वरोरा / प्रतिनिधी**

इनरव्हील क्लब वरोराचा पदग्रहण सोहळा पीडीसी वर्षा कोतपल्लीवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ईशान प्लाझा आंबेडकर चौक येथे मोठ्या थाटात संपन्न झाला.इनरव्हील क्लब वरोराच्या मावळत्या अध्यक्षा मधू जाजू यांच्याकडून नूतन अध्यक्षा निलिमा गुंडावार यांनी पदभार स्वीकारला. तसेच नवीन कार्यकारणी मध्य उपाध्यक्ष म्हणून जैनल सिद्दीकोट , सचिव म्हणून डॉ . साक्षी उपलेंचवार , ट्रेझरर म्हणून दीपाली टिपले , आय .स.ओ म्ह्णून अर्वा अली , सी.सी म्हणून कविता बाहेती यांनी पदभार स्वीकारला.

या पदग्रहण सोहळ्यात अतिवृष्टीचीमुळे नुकसान झालेल्या महिलांना फूड पॅकेट्स देऊन मदत करण्यात आली . या कार्यक्रमाला रोटरी क्लब वरोराचे नूतन सचिव अदनान सिद्दीकोट , रोटेरियन विशाल जाजू , किशोर टिपले , राजीव गुंडावार, आनंद गुंडावार यांची प्रमुख उपस्थिती होती . या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहा जवदंड व सुचेता पदमावार यांनी केले तर आभारप्रदर्शन कविता बाहेती यांनी केले , या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता वंदना बोढे, अपेक्षा पामपट्टीवार, वैशाली पदमावार , अनु डोंगरवार , मानसी चिकनकर, प्रणाली देरकर, प्रतिभा मणियार ,आभा सायरे, संध्या बारई , कल्पना कथडे, पूजा मुंधडा, पूजा बोगावार, पूनम जैस्वाल . किरण जाखोटिया , व क्लबच्या इतर सदस्या यांनी अथक परिश्रम घेतले .

# घर कोसळल्याने जखमी झालेल्या कुटुंबियाच्या मदतीसाठी सरसावली यंग चांदा ब्रिगेड

## एकाच परिवारातील तिघे जखमी, आ. किशोर जोरगेवार यांनी घेतली भेट



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

घर कोसळल्याने एकाच परिवारातील आई आणि दोन मुले जखमी झाल्याची घटना आज सकाळच्या सुमारास बाबुपेठ येथील पंचशिल चौकात घडली. घटनेची माहिती मिळताच यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देत कुटुंबातील जखमींना तात्काळ रुग्णालयात दाखल केले आहे. तेथे त्यांच्यावर उपचार सुरु आहे. मंजु बारसागडे आईचे तर आर्यन बारसागडे वय १०, प्रशिक बारसागडे वय १२ अशी जखमी मुलांची नावे आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली असुन त्यांच्यावर सुरु असलेल्या उपचाराबाबत माहिती घेतली आहे.

आज सकाळी १० च्या सुमारास बाबुपेठ येथील पंचशिल चौकात राहणा-या बारसागडे यांच्या घरावर बाजुच्या घराची भिंत कोसळली या घटनेत आई आणि दोन छोटी मुले जखमी झाली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर यंग चांदा ब्रिगेडच्या महिला शहर संघटिका वंदना हातगावर, शहर संघटक रुपेश पांडे, यंग चांदा ब्रिगेडच्या बंगाली महिला समाज शहर अध्यक्षा सविता दंडारे, बादल हजारे, प्रतिक हजारे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. यावेळी जखमींना तात्काळ खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करुन त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथेही यंग चांदा ब्रिगेडच्या युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, सोनाली आंबेकर यांनी जखमी कुटुंबाला योग्य वैद्यकीय मदत मिळवून दिली. दरम्यान घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर जोरगेवार यांनी रुग्णालयात जावून जखमी परिवाराची भेट घेतली यावेळी डॉक्टरांकडून जखमींवर सुरु असलेल्या उपचाराबाबतही आमदार किशोर जोरगेवार यांनी विचारना केली असून उपचाराकरीता आर्थिक मदत केली आहे.

# पूर्व विदर्भातून अधिवेशनाला जाणार हजारो ओबीसी बांधव

- नवी दिल्लीत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सातवे महाअधिवेशन ७ ऑगस्टला
- विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांच्या मार्गदर्शनात अधिवेशनाची तयारी सुरु

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सातवे महाअधिवेशन ताल कटोरा इनडोअर स्टेडियम, नवी दिल्ली येथे ७ ऑगस्टला आयोजित केले आहे. या अधिवेशनाची महासंघाचे राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे यांच्या मार्गदर्शनात तयारी सुरु आहे.



ओबीसींची जातनिहाय जनगणना व्हावी, जनगणनेत निष्पन्न झालेल्या ओबीसी संख्येनुसार संपूर्ण भारतात ओबीसी आरक्षण लागू करण्यात यावे, केंद्र सरकारने २४३(ऊ), २४३(ॲ) सेक्शन ६ मध्ये बदल करावा, केंद्रात स्वतंत्र ओबीसी मंत्रालय स्थापन व्हावे, प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व्हावे, ओबीसी विद्यार्थ्यांना शंभर टक्के शिष्यवृत्ती मिळावी, शेतकऱ्यांना शंभर टक्के सबसिडीवर योजना लागू करावी, ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळावी, क्रिमिलियरची मर्यादा वाढवावी, आदी अनेक विषयांवर अधिवेशनात मंथन होणार आहे.

या अधिवेशनासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार, मुख्यमंत्री भूपेश बघेल, मुख्यमंत्री नितीश कुमार, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री स्टॅलीन, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री भगवान कराड, केंद्रीय मंत्री कपिल पाटील, माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव, माजी मंत्री छगन भुजबळ, कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आदींना निमंत्रित केले आहे.

या राष्ट्रीय अधिवेशनाचा प्रमुख उद्देश हा देखील आहे की, या राष्ट्रीय अधिवेशनात देशातील कानाकोपऱ्यातून जे ओबीसी समाज बांधव भगिनी उपस्थित होणार आहेत, त्यांनी ओबीसी समाजाला त्यांचे संपूर्ण हक्क व अधिकार जो पर्यंत प्राप्त होत नाही, तोपर्यंत देशातील शेवटच्या ओबीसी समाज घटकाला जागृत करुण लढण्यासाठी तयार करावे.

या अधिवेशनाला लाखोंच्या संख्येने ओबीसी समाज बांधवानी उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, समन्वयक डॉ. अशोक जिवतोडे, सहसचिव शरद वानखेडे, महामंत्री मुकेश नंदन यांच्यासह महासंघ, कृती समिती, सेवासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

## परिसरातील महीलांची तक्रार; तहसीलदारांना निवेदन

# सामाजिक सभागृहातील खाजगी व्यसनमुक्ती केंद्र हटवा

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

गोंडपिपरी येथील अंबिकानगर वसाहतीमधील सर्व्हे क्रमांक ३६२ मध्ये खुल्या जागेत सर्वांना उपयोगात यावे म्हणून सामाजिक सभागृह बांधण्यात आले.मात्र त्याठिकाणी खाजगी व्यसनमुक्ती केंद्र चालविला जात आहे.सभागृहात चालू करण्यात आलेले व्यसनमुक्ती केंद्र हटवून याठिकाणी सार्वजनिक वाचनालय,व्यायामशाळा सुरू करण्यात यावी,अशी मागणी परिसरातील महिलांनी केली असून त्यासंदर्भात गुरुवारला गोंडपिपरीचे तहसीलदार के.डी.मेश्राम यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.



शासकीय नियमानुसार एनए प्लॉट धारकासाठी ओपन स्पेस राखीव ठेवला जातो.याठिकाणी उद्यान,क्रीडांगण,योगशाळा व वाचनालय यासाठी दहा टक्के जागेत बांधकाम आणि उर्वरित खुल्या जागेत बालक व जेष्ठ नागरिकांकरिता बाल उद्यान नियोजित असतो.अशावेळी गोंडपिपरी येथील सर्व्हे न.३६२ मधील एनए लेआऊट वरील ओपनस्पेसच्या दहा टक्के जागेवर सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सामाजिक सभागृह बांधण्यात आले परंतू या सभागृहात लेआऊटधारकाची परवानगी न घेता खाजगी संस्था परस्पर व्यसनमुक्ती केंद्र चालवित आहे.सदर शासकीय इमारतीचा खाजगी संस्था उपयोग करीत असून त्यांच्या कार्यक्रमामुळे लेआउटधारकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.या परिसरात अरुंद रस्ते आहेत.वाहनाची वर्दळ असल्यामुळे लहान मुलांसंदर्भात अपघात होण्याची शक्यता आहे. व्यसनमुक्ती केंद्राच्या कार्यक्रमामुळे डॉक्टर, इंजिनिअर एमपीएससीच्या तयारीत असलेल्या मुलांना त्रास होत आहे. त्यांच्या अभ्यासात अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे सदर सामाजिक सभागृहात सार्वजनिक वाचनालय, व्यायामशाळा सुरू करीत ते सर्वांसाठी उपयोगात आणावी. उद्याचा उज्वल भारत घडवणारे बालक व त्यांचा शारीरिक विकासाकरिता क्रीडांगण करून द्यावे.ग्रीन जिमचा देखील पर्याय खुला आहे.त्याचवेळी इथे शासकीय नियमानुसार बाल उद्यान तयार करावे.आजच्या या विज्ञान युगात मंदिरापेक्षा क्रीडांगण, वाचनालयास अधिक महत्व देऊन कुलूपबंद असलेले सामाजिक सभागृह खुले करून द्यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.यासंदर्भातील पत्राच्या प्रतिलिपी राजुरा विधानसभेचे आमदार सुभाष धोटे तसेच बलारपूर विधानसभा क्षेत्राचे आमदार सुधीर मुनगंटीवार, जिल्हाधिकारी चंद्रपूर, नगर पंचायतचे बांधकाम सभापती यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत.

**प्रशासनाने कुलूप ठोकले**

गोंडपिपरी येथील प्लॉटधारकांच्या ओपनस्पेस जागेत सामाजिक सभागृहाची बांधकामाची मागणी करण्यात आली होती.त्यानुसार सभागृहाकरीता निधी सुद्धा मंजूर करण्यात आला.इमारतही पूर्णत्वास आली मात्र सामाजिक सभागृहाऐवजी त्याठिकाणी व्यसनमुक्ती केंद्र उभे केले.रहिवासी प्लॉटधारकांनी सदर प्रकाराची तक्रार नगर पंचायत तथा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली.सदर विभागाने याची दखल घेत चौकशी केली व चौकशीनंतर प्रशासनाने सामाजिक सभागृह असलेल्या व्यसनमुक्ती केंद्राच्या इमारतीला कुलूप ठोकले.

# त्या रस्त्यावरील खड्डे बुजवा



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

तुकूम येथील एस. टी. वर्क शॉप ते बी.जे.एम. कारमेल अकॅडमी ते अयप्पा मंदीर पर्यंतच्या रस्त्यावर असंख्य खड्डे पडले आहेत.हे खड्डे त्वरित बुजविण्यात यावे अशी मागणी भाजयुमो महासचिव सुनील डोंगरे यांनी केली असून यासंदर्भातील निवेदन मनपा आयुक्तांना गुरुवार २१ जुलैला महानगर भारतीय जनता युवा मोर्चा तर्फे देण्यात आले.यावेळी भाजयुमो युवानेते सुशांत अक्केवार, सुमित भोजेकेर,स्वप्नील फाळके, अभि काळे व अमित तिवस्कर याची उपस्थिती होती.

उपरोक्त परिसरात बी.जे.एम. कारमेल अकॅडेमी शाळा असल्यामुळे मोठया प्रमाणात वर्दळ सुरू असते, अनेक पालक आपल्या मुलाला शाळेत ने-आण करण्याकरीता दुचाकीने येत असतात तसेच विद्यार्थीचे ऑटोरिक्षा सुध्दा मोठया प्रमाणात येत असतात. सदरील रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविणे अत्यंत आवश्यक आहे.असे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.मनपा प्रशासनने त्वरित कारवाई न केल्यास भाजयुमो महानगर तर्फे आंदोलन करण्यात येईल असा इशारा डोंगरे यांनी दिला आहे.